## आजचे पंचांग

रविवार, दि. १५ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, कृष्णपक्ष, एकादशी सकाळी ९-१७ पर्यंत, दिवस नक्षत्र–श्रवण रात्री (पहाटे पर्यंत) ५-५६ पर्यंत, योग– परिघ सकाळी १०-२५ पर्यंत, चंद्र रास- मकर, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

## एमआयडीसी उद्योजकांना दिलासा

**अहिल्यानगर :** शहराजवळील नागापूर एमआयडीसीमध्ये औद्योगिक वापरासाठी लागणाऱ्या एलपीजी गॅसचा पुरवठा खंडित झाल्याने अनेक उद्योगांचे उत्पादन ठप्प झाले होते. या पार्श्वभूमीवर उद्योजकांना दिलासा देत प्रशासनाने 'पीएनजी' (बंदिस्त वाहिन्यांद्वारे नैसर्गिक वायू) गॅस पुरवठा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या आठ दिवसांत हा पुरवठा सुरू होणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. १५ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १६९ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### गॅस टंचाईचा परिणाम शिर्डीत; प्रसाद भोजन व्यवस्थेत बदल

**शिर्डी :** एलपीजी गॅस टंचाईचा परिणाम आता शिर्डीतील साईभक्तांवरही दिसू लागला आहे. या पार्श्वभूमीवर श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट प्रशासनाने प्रसादालयातील भोजन व्यवस्थेत तात्पुरता बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. पूर्वी दिल्या जाणाऱ्या वरण-भाताऐवजी मसाले भात, एक रसा भाजी, चपाती आणि गूळ शिरा असा प्रसाद दिला जात आहे. तसेच लाडू प्रसादावरही मर्यादा आणत प्रत्येक भाविकाला एकच लाडू पाकीट देण्याची व्यवस्था आज, शनिवारपासून लागू करण्यात आली आहे. परिस्थिती सामान्य होईपर्यंत ही व्यवस्था कायम राहणार असल्याचे संस्थानकडून सांगण्यात आले.

### दहावी-बारावी परीक्षांतील गैरप्रकारांवर कारवाई

**मुंबई :** राज्य मंडळ आयोजित दहावी आणि बारावीच्या परीक्षांदरम्यान आढळलेल्या गैरप्रकारांवर प्रशासनाने कठोर कारवाई करत निलंबनाची संख्या शतकापार नेली आहे. आतापर्यंत एकूण १०३ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून, परीक्षेची शुचिता राखण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे मंडळाकडून सांगण्यात आले.

या प्रकरणात सर्वाधिक कारवाई अमरावती विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रात करण्यात आली आहे. परीक्षेदरम्यान गैरप्रकारांना प्रोत्साहन देणे, नियमांचे उल्लंघन करणे तसेच कर्तव्यात हलगर्जीपणा करणे अशा कारणांमुळे संबंधित कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. राज्य मंडळाने परीक्षा प्रक्रिया पारदर्शक आणि निष्पक्ष ठेवण्यासाठी कठोर पावले उचलली आहेत.

## दोन भारतीय LPG टँकर्सना होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षित मार्ग

# भारताला दिलासा; इराणने शब्द पाळला!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील वाढत्या युद्धतणावाच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी दिलासादायक घडामोड समोर आली आहे. इराणने दोन भारतीय एलपीजी टँकर्सना Strait of Hormuz या महत्त्वाच्या समुद्री मार्गातून सुरक्षितपणे मार्गक्रमण करण्याची परवानगी दिली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, इराणच्या भारतातील राजदूतांनी सकारात्मक संकेत दिल्यानंतर काही तासांतच हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे देशात निर्माण झालेल्या एलपीजी तुटवड्याच्या भीतीत काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता आहे.



मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षामुळे इराणने काही काळासाठी होर्मुझ सामुद्रधुनीतील जहाजवाहतुकीवर निर्बंध आणले होते. इराण आणि इस्रायल-अमेरिका यांच्यातील तणावामुळे या मार्गावरील हालचालींवर परिणाम झाला होता. याचा थेट परिणाम भारतासह अनेक देशांच्या इंधन पुरवठ्यावर झाला. परिणामी भारतात व्यावसायिक गॅसच्या पुरवठ्यावर काही प्रमाणात मर्यादा आणत घरगुती एलपीजी सिलेंडर पुरवठ्याला प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

दरम्यान, भारतातील इराणचे राजदूत Mohammad Fatahali यांनी शुक्रवारी संकेत दिले होते की भारताला होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. भारत हा आमचा जुना मित्र देश असून या समस्येचे समाधान करण्यासाठी इराण सकारात्मक भूमिका घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. त्यानंतर लगेचच दोन भारतीय टँकर्सना मार्ग देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली.

भारत सरकारच्या शिपिंग मंत्रालयातील अधिकारी Rajesh Kumar Sinha यांनी सांगितले की, पर्शियन आखातात सध्या भारतीय ध्वज असलेली २४ जहाजे कार्यरत असून त्यावर ६७७ भारतीय नाविक काम करत आहेत. तसेच होर्मुझ सामुद्रधुनीच्या पूर्वेकडील ओमानच्या आखातात तीन भारतीय जहाजे असून त्यावर ७६ भारतीय नाविक कार्यरत आहेत. याशिवाय संपूर्ण खाडी परिसरात सुमारे २३ हजार भारतीय नाविक विविध जहाजांवर कार्यरत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

दरम्यान, भारतातील इराणच्या सर्वोच्च नेत्यांचे प्रतिनिधी अब्दुल मस्जीद यांनी स्पष्ट केले की होर्मुझ सामुद्रधुनी पूर्णपणे बंद करण्यात आलेली नाही. सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे काही जहाजांना मार्गक्रमण करताना अडचणी येत असल्या तरी अनेक जहाजे अजूनही या मार्गाने प्रवास करत असल्याचे त्यांनी सांगितले. याचवेळी देशात एलपीजी सिलेंडरच्या तुटवड्याबाबत पसरत असलेल्या अफवांवर केंद्र सरकारने स्पष्टीकरण दिले आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव Sujata Sharma यांनी नागरिकांना घाबरून सिलेंडर बुकिंग करू नये, असे आवाहन केले. त्यांनी सांगितले की ५ मार्चपासून देशातील घरगुती एलपीजी उत्पादनात सुमारे ३० टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. तसेच देशभरातील सुमारे २५ हजार वितरकांपैकी कुठेही एलपीजी साठा संपल्याची अधिकृत माहिती नाही. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अनावश्यक पॅनिक बुकिंग टाळावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. इराणने दिलेल्या परवानगीमुळे भारतातील एलपीजी पुरवठा स्थिर राहण्यास मदत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## अजितदादा विमानात बसतानाचे सीसीटीव्ही फुटेज द्या" – अमोल मिटकरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार Amol Mitkari यांनी अजितदादा विमान दुर्घटनेप्रकरणी पुन्हा एकदा संशय व्यक्त करत तपास यंत्रणांकडून महत्त्वाचे पुरावे जाहीर करण्याची मागणी केली आहे. "अंतिम अहवाल पुढच्या वर्षी द्या, पण सर्वप्रथम अजितदादा विमानात बसतानाचे सीसीटीव्ही फुटेज महाराष्ट्रासमोर आणा," असे आवाहन त्यांनी केले आहे.

Ajit Pawar यांचा २८ जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या विमान अपघातात मृत्यू झाल्याची घटना घडल्यानंतर हा अपघात की घातपात, याबाबत अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांतील काही आमदारांनीही या दुर्घटनेबाबत संशय व्यक्त केला असून, सखोल चौकशीची मागणी केली आहे.

या पार्श्वभूमीवर मिटकरी यांनी शनिवारी सोशल मीडियावर पोस्ट करत तपास प्रक्रियेवर नाराजी व्यक्त केली. त्यांनी म्हटले की, या प्रकरणात महाराष्ट्रातील जनतेच्या मनात अनेक शंका आहेत. "कटाचे मुख्य सूत्रधार कोण आहेत, सुमित कपूर, साहिल मदन, यश आणि त्यांचा बाप सिंग कुठे आहेत, हेही स्पष्ट झालेले नाही," असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

तपास यंत्रणांना उद्देशून त्यांनी म्हटले की, "डीजीसीएचा अंतिम अहवाल आणि ब्लॅक बॉक्सचा डेटा पुढच्या वर्षी द्यायचा असेल तर द्या, पण निदान अजितदादा विमानात बसतानाचे सीसीटीव्ही फुटेज तरी सार्वजनिक करा." या पोस्टसोबत त्यांनी एक फोटोही शेअर केला असून त्यात तपास यंत्रणांवर तीव्र टीका करण्यात आली आहे. अपघातानंतर दीड महिन्याहून अधिक कालावधी उलटूनही ठोस पुरावे समोर आले नसल्याचा आरोप त्या पोस्टमध्ये करण्यात आला आहे.

## गॅस टंचाईच्या अफवांवर विश्वास ठेवू नका; राज्यात पुरेसा साठा – भुजबळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** इराणविरोधात इस्रायल आणि अमेरिका यांनी सुरू केलेल्या कारवायांमुळे मध्यपूर्वेतील तणाव तीव्र झाला असून त्याचे पडसाद जगभर उमटताना दिसत आहेत. Strait of Hormuz ही महत्त्वाची सामुद्रधुनी बंद झाल्याने भारतात इंधन व गॅस पुरवठ्याबाबत चिंता निर्माण झाली आहे. काही ठिकाणी गॅस सिलेंडरसाठी नागरिकांच्या रांगा लागल्याचे चित्र दिसत असताना राज्यात टंचाई नसल्याचा दावा सरकारने केला आहे.

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री Chhagan Bhujbal यांनी सोशल मीडियावरून नागरिकांना आवाहन करत गॅस व इंधन तुटवड्याबाबत पसरत असलेल्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे स्पष्ट केले. "आखाती देशांतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यात अनेक संभ्रम निर्माण केले जात आहेत. मात्र घरगुती एलपीजीचा कोणताही तुटवडा नाही," असे त्यांनी सांगितले.

भुजबळ यांच्या माहितीनुसार राज्यात घरगुती एलपीजीची दैनंदिन मागणी सुमारे ९,००० मेट्रिक टन आहे. मात्र पुरवठा वाढवून तो ११,००० मेट्रिक टनांपर्यंत नेण्यात आला आहे. मार्च महिन्यात गेल्या सहा महिन्यांच्या तुलनेत अधिक सिलेंडर उपलब्ध करून देण्यात आले असून पेट्रोल व डिझेलचाही पुरेसा साठा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, गॅस पुरवठा साखळीवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्वाखाली विशेष समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. रुग्णालये, शाळा आणि अत्यावश्यक सेवांना गॅस पुरवठा प्राधान्याने मिळेल याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच तक्रारींसाठी जिल्हा व तालुका स्तरावर नियंत्रण कक्षही सुरू करण्यात आले आहेत.

## खर्ग बेटावरील हल्ल्यानंतर तणाव वाढला; इराणचा मोठा इशारा

# यूएईतील बंदरे आणि अमेरिकन लष्करी तळांपासून दूर राहा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान :** मध्यपूर्वेत वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणने युनायटेड अरब अमिरातीमधील (UAE) नागरिक आणि रहिवाशांना गंभीर इशारा दिला आहे. इराणच्या खर्ग बेटावर अमेरिकेने केलेल्या हल्ल्यानंतर परिस्थिती आणखी चिघळली असून, इराणने यूएईतील अमेरिकन लष्करी तळ आणि पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे बंदरे, धक्के आणि अमेरिकन सैन्याच्या उपस्थिती असलेल्या भागांपासून तात्काळ दूर राहण्याचे आवाहन इराणकडून करण्यात आले आहे.



इराणच्या लष्करी संघटना (IRGC) यांनी यासंदर्भात कठोर भूमिका मांडली आहे. इराणच्या लष्करी मध्यवर्ती कमांडने, सरकारी दूरदर्शनवरून प्रसिद्ध केलेल्या निवेदनात स्पष्ट केले की, इराणवर होणारे हल्ले सुरूच राहिले तर शत्रू देशांच्या लष्करी ठिकाणांवर प्रतिहल्ला करणे हा इराणचा वैध अधिकार आहे.

निवेदनात म्हटले आहे की, अमेरिकेने इराणच्या Kharg Island या महत्त्वाच्या तेल निर्यात केंद्रावर हल्ला केल्यामुळे परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण झाली आहे. या पार्श्वभूमीवर यूएईमधील अमेरिकन लष्करी तळ, बंदरे आणि संबंधित पायाभूत सुविधा संभाव्य लक्ष्य ठरू शकतात, असा इशारा देण्यात आला आहे.

इराणच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, आपल्या राष्ट्रीय सार्वभौमत्वाचे आणि भूप्रदेशाचे रक्षण करणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे जर हल्ले सुरूच राहिले, तर इराण शत्रू राष्ट्रांच्या लष्करी तळांवर आणि संबंधित ठिकाणांवर कारवाई करू शकतो. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन इराणने यूएईमध्ये राहणाऱ्या नागरिकांना आणि परदेशी रहिवाशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. बंदरे, धक्के, तसेच ज्या भागांमध्ये अमेरिकन सैन्याची उपस्थिती आहे अशा ठिकाणांपासून सुरक्षित अंतर राखावे किंवा शक्य असल्यास ती ठिकाणे तातडीने रिकामी करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

इराणी लष्कराने असेही स्पष्ट केले की, अमेरिकन क्षेपणास्त्रे किंवा लष्करी हालचाली असलेल्या भागांमध्ये सामान्य नागरिकांनी जाणे टाळावे. संभाव्य संघर्षामुळे अशा ठिकाणी मोठा धोका निर्माण होऊ शकतो.

दरम्यान, अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढता संघर्ष संपूर्ण मध्यपूर्वेत अस्थिरता निर्माण करत आहे. विशेषतः तेलवाहतूक मार्ग, बंदरे आणि लष्करी तळ यांच्याभोवती तणाव वाढल्यामुळे जागतिक स्तरावरही चिंता व्यक्त केली जात आहे.

## अवघ्या पाच महिन्यांत १.०८ लाख घरांवर सौर यंत्रणा कार्यान्वित

# पंतप्रधान सूर्य घर' योजनेत महाराष्ट्र अव्वल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेकडे वाटचाल करणाऱ्या पंतप्रधान सूर्य घर : मोफत वीज योजना या महत्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावले आहे. निवासी घरांच्या छतांवर सौर यंत्रणा बसविण्याच्या बाबतीत महाराष्ट्राने मोठी झेप घेत देशात पहिला क्रमांक मिळवला आहे. देशातील एकूण सौर संचांपैकी सुमारे २० टक्के वाटा एकट्या महाराष्ट्राचा असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या ताज्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या अवघ्या पाच महिन्यांच्या कालावधीत महाराष्ट्रात तब्बल १ लाख ८ हजार ३२७ घरांमध्ये सौर ऊर्जा यंत्रणा बसविण्यात आल्या आहेत. सौर ऊर्जेचा प्रसार वेगाने वाढविण्यात राज्याने उल्लेखनीय कामगिरी करत देशातील इतर आघाडीच्या राज्यांनाही मागे टाकले आहे.

सौर यंत्रणांच्या स्थापनेत महाराष्ट्राने मोठी आघाडी घेत उत्तर प्रदेश आणि गुजरात यांसारख्या राज्यांनाही मागे टाकले आहे. आकडेवारीनुसार उत्तर प्रदेशमध्ये ९५ हजार ६६५ आणि गुजरातमध्ये ९४ हजार ३६४ घरांवर सौर यंत्रणा बसविण्यात आल्या आहेत. मात्र महाराष्ट्राने १ लाखाहून अधिक घरांवर सौर संच बसवून देशात आघाडी घेतली आहे. याहूनही विशेष बाब म्हणजे राजस्थान, आसाम, छत्तीसगड आणि ओडिशा या चार राज्यांतील सौर यंत्रणांची एकत्रित संख्या देखील महाराष्ट्राच्या आकड्यापेक्षा कमी आहे. तसेच केरळ, मध्य प्रदेश, हरियाणा, उत्तराखंड आणि जम्मू-काश्मीर या पाच राज्यांच्या एकत्रित संख्येपेक्षाही महाराष्ट्रातील सौर संचांची संख्या जास्त आहे. यामुळे राज्यातील सौर ऊर्जा मोहिमेला मोठे यश मिळाल्याचे स्पष्ट होत आहे.

सौर ऊर्जेच्या वापराला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने ही योजना सुरू केली आहे. या योजनेमुळे नागरिकांना घराच्या छतावर सौर पॅनेल बसवून वीज निर्मिती करता येते. त्यामुळे वीज बिलात मोठी बचत होते.

## महेंद्र थोरवे यांच्याविरोधात अब्रुनुकसानीचा दावा

**अलिबाग :** रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी कर्जतचे शिवसेना आमदार महेंद्र थोरवे यांच्या विरोधात अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला आहे. माणगाव सत्र न्यायालयात हा दावा सादर करण्यात आला. मंगेश काळोखे हत्या प्रकरणात थोरवे यांनी केलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर तटकरे यांनी ही कायदेशीर कारवाई केली आहे. थोरवे यांनी केलेले आरोप निराधार व बदनामीकारक असल्याचा दावा तटकरे यांच्या बाजूने करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे रायगडच्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. पुढील सुनावणीदरम्यान न्यायालय काय निर्णय देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नाशिक कुंभमेळ्यासाठी २२ हजार १८१ कोटींच्या कामांना मान्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या माध्यमातून येथे येणारा प्रत्येक भाविक भारताचे पर्यायाने महाराष्ट्राचे प्रतिबिंब सोबत नेणार आहे. त्यामुळे कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनातून जगाला आकर्षण वाटणारा कुंभमेळा करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिले. कुंभमेळाच्या कामांसाठी 22 हजार 181 कोटींच्या कामांना विधानभवनातील झालेल्या कुंभमेळा शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

पहिल्या टप्प्यातील 5 हजार 140 कोटी आणि दुसऱ्या टप्प्यातील 17 हजार 41 कोटी रुपयांच्या कामांचा समावेश आहे. बैठकीला मंत्री छगन भुजबळ, मंत्री गिरीश महाजन, मंत्री शिवेंद्र सिंह राजे भोसले, मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सीमा हिरे, आमदार देवयानी फरांदे, आमदार सरोज अहिरे, आमदार सर्वश्री पंकज भुजबळ, माणिकराव कोकाटे, दिलीप बनकर, हिरामण खोसकर, राहुल ढिकले, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नाशिक येथील काळाराम मंदिराचे काम करताना आजूबाजूच्या वाहतुकीला अडथळा होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. राम काल पथाच्या कामाला गती देण्यात यावी. शहरातील ऑप्टिकल फायबर केबलचे काम वेगाने पूर्ण करावे.

तसेच स्मार्ट सिटी प्रकल्पातील नादुरुस्त सीसीटीव्ही बाबत पडताळणी करून नवीन सीसीटीव्ही कार्यान्वित करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची मान्यता घ्यावी. अमृत स्नानांच्या दरम्यान शहरातील भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता महाविद्यालयांमधील जागा पार्किंग तसेच पोलिसांसाठी घेण्याबाबत संबंधित विभागाशी चर्चा करून निर्णय घ्यावा. निवृत्तीनाथ मंदिर ट्रस्टच्या कामांचा समावेश करून पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

## आमदार रईस शेख यांची मागणी; विधेयक समितीकडे पाठवून सविस्तर चर्चा व्हावी

# धर्म स्वातंत्र्य विधेयकावर सार्वजनिक सुनावणी घ्या!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्य सरकारने विधानसभेत सादर केलेल्या धर्म स्वातंत्र्य विधेयक २०२६वर सखोल चर्चा व्हावी तसेच त्यावर सार्वजनिक सुनावणी आयोजित करावी, अशी मागणी समाजवादी पक्षाचे भिवंडी पूर्व मतदारसंघाचे आमदार Rais Shaikh यांनी केली आहे. हे विधेयक दोन्ही सभागृह सदस्यांच्या समितीकडे पुनर्विचारासाठी पाठवून नागरी समाज, तज्ज्ञ आणि अल्पसंख्याक संस्थांना आपली मते मांडण्याची संधी दिली पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.



यासंदर्भात बोलताना आमदार शेख म्हणाले की, राज्यात सध्या महागाई, गॅसचा तुटवडा आणि रोजगाराच्या प्रश्नांसारख्या गंभीर समस्या आहेत. अनेक छोटे व्यवसाय आणि हॉटेल उद्योग अडचणीत सापडले आहेत. अशा परिस्थितीत लोकांच्या दैनंदिन अडचणींवर चर्चा करण्याऐवजी समाजात फूट पाडू शकणाऱ्या विषयांवर चर्चा होत असल्याची टीका त्यांनी केली.

धर्म स्वातंत्र्य विधेयकाबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना शेख म्हणाले की, बळजबरीने धर्मांतर करण्यास प्रतिबंध करणारे विद्यमान कायदे आधीपासूनच अस्तित्वात आहेत. त्यामुळे नवीन विधेयकाची आवश्यकता काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. त्यांच्या मते, या विधेयकामुळे अल्पसंख्याक समाजाला लक्ष्य केले जाऊ शकते. त्यामुळे या विषयावर सखोल चर्चा होणे अत्यावश्यक आहे.

आमदार शेख यांनी सांगितले की, हे विधेयक चर्चेविना मंजूर करण्यात येऊ नये. त्यासाठी ते विधेयक दोन्ही सभागृह सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठवण्याची नोटीस देणार आहेत. या समितीत अल्पसंख्याक समाजाचे प्रतिनिधित्व असलेले लोकप्रतिनिधी असावेत, अशीही त्यांची मागणी आहे.

ते पुढे म्हणाले की, राज्याच्या विधिमंडळात अल्पसंख्याकांचे प्रतिनिधित्व तुलनेने कमी आहे. त्यामुळे या विधेयकावर नागरी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आणि अल्पसंख्याक संघटनांना आपली भूमिका मांडण्याची संधी मिळाली पाहिजे. त्यासाठी विधेयकावर सार्वजनिक सुनावणी घेणे आवश्यक आहे. शासनाने अधिकृत नोटीस प्रसिद्ध करून नागरिकांकडून सूचना व आक्षेप मागवावेत आणि त्यानंतर सुनावणी आयोजित करावी, असेही त्यांनी सुचवले.

या संदर्भात ते सोमवारच्या दिवशी विधानसभा अध्यक्षांना पत्र लिहिणार असल्याचेही शेख यांनी सांगितले. दरम्यान, राज्यातील सुमारे ३५ नागरी व अल्पसंख्याक संघटनांनी या विधेयकाला विरोध दर्शवला आहे.

सामाजिक कार्यकर्त्या तिस्ता सेटाल्वद यांनीही या विधेयकावर टीका करताना म्हटले आहे की, प्रस्तावित कायद्यामुळे गोपनीयता, धर्मस्वातंत्र्य आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार धोक्यात येऊ शकतात.

दरम्यान, या विधेयकावर पुढील काही दिवसांत विधानसभेत चर्चा होण्याची शक्यता असून, त्यावरून राज्यातील राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

## गॅस टंचाईवरून संजय राऊत यांचा सरकारवर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** आखाती देशांतील युद्धामुळे इंधन व गॅस पुरवठ्यावर परिणाम होत असल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (ठाकरे गट) नेते आणि खासदार संजय राऊत यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. "नरेंद्रही गायब, सिलेंडरही गायब" अशी घोषणा दिल्लीत होत असल्याचा उल्लेख करत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला.

राऊत म्हणाले की, युद्धामुळे निर्यातीवर परिणाम झाला असून अनेक शेतकऱ्यांचा माल देशात अडकून नुकसान होत आहे. दुसरीकडे गॅस टंचाईमुळे नागरिकांना सिलेंडरसाठी तासनतास रांगेत उभे राहावे लागत आहे. हॉटेल व्यावसायिकांनाही अडचणींचा सामना करावा लागत असून काहींना चुलीचा आधार घ्यावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. "माझ्या स्वतःच्या घरातही हीच परिस्थिती आहे. माझ्या पत्नीला दोन दिवसांपासून सिलेंडर मिळत नाही. सकाळपासून मला ६०-७० लोक भेटले, तेही सिलेंडर कुठे मिळेल याची विचारणा करत होते," असे राऊत यांनी म्हटले. देशातील लखनऊ, मुंबई, कोलकाता, चेन्नई, दिल्ली आणि जम्मूसारख्या शहरांतही सिलेंडरसाठी मोठ्या रांगा लागल्याचा दावा त्यांनी केला. नोटाबंदीच्या काळात जशा रांगा लागल्या होत्या, तशीच परिस्थिती आता गॅस सिलेंडरसाठी निर्माण झाली असल्याची टीकाही त्यांनी केली. दरम्यान, कोविड काळात सरकारने देश चांगला सांभाळल्याचा दावा पंतप्रधानांनी केला होता. मात्र त्यावरही टीका करत राऊत म्हणाले की, त्या काळातही लोकांना मोठ्या संकटांना सामोरे जावे लागले होते. त्यामुळे सरकारने परिस्थितीवर ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

## संपादकीय

# अल्पसंख्याक दर्जाच्या आडून ‘सवलतींचा बाजार’?

**महाराष्ट्रात अल्पसंख्याक दर्जा देण्याच्या प्रक्रियेभोवती निर्माण झालेला वाद हा केवळ प्रशासकीय निर्णयापुरता मर्यादित नसून शिक्षणव्यवस्थेतील मोठ्या विसंगतीकडे लक्ष वेधणारा आहे. बहुसंख्याकांचे हित जपणारे सरकार अशी प्रतिमा असलेल्या सत्ताधाऱ्यांवर ‘अल्पसंख्याकांचे लांगूलचालन’ केल्याचा आरोप फारसा होत नसला, तरी शिक्षणसंस्थांना दिल्या जाणाऱ्या अल्पसंख्याक दर्जाच्या बाबतीत सरकारने सैल धोरण अवलंबले आहे का, असा प्रश्न आता प्रकर्षाने उपस्थित होत आहे.**

या चर्चेला तोंड फुटले ते एका वादग्रस्त घटनाक्रमामुळे. राज्याचे उपमुख्यमंत्री Ajit Pawar यांच्या अपघाती निधनानंतर अल्पसंख्याक दर्जाच्या काही फाइल्स मंजूर झाल्याचा मुद्दा पुढे आला. संबंधित आदेश उपमुख्यमंत्री नसताना कसा काढला गेला, असा प्रश्न उपस्थित झाला आणि सरकारने तत्काळ त्या निर्णयाला स्थगिती दिली. आदेश काढणाऱ्या अधिकाऱ्याची बदलीही करण्यात आली. नंतर असे समोर आले की संबंधित फाइल्सना मंजुरी पूर्वीच देण्यात आली होती, मात्र ऑनलाइन प्रक्रिया बंद असल्याने आदेश नंतर जारी झाले. या घटनेने अल्पसंख्याक दर्जाच्या संपूर्ण प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण केले.

१९९२ मध्ये केंद्र सरकारने लागू केलेल्या कायद्यानुसार मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारसी आणि जैन या धर्मीयांनी स्थापन केलेल्या शिक्षणसंस्थांना अल्पसंख्याक दर्जा दिला जातो. महाराष्ट्रात यासोबत ‘भाषिक अल्पसंख्याक’ ही श्रेणीही जोडण्यात आली आहे. यात हिंदी, कन्नड, मल्याळम, गुजराती, सिंधी, उर्दू, मारवाडी आणि इतर काही भाषा बोलणाऱ्या समुदायांच्या संस्थांचा समावेश होतो.

या दर्जामुळे संस्थांना अनेक महत्त्वाच्या सवलती मिळतात. उदाहरणार्थ, शिक्षक व प्राध्यापकांच्या भरतीत सरकारला हस्तक्षेप करता येत नाही. तसेच शिक्षण हक्क कायदा म्हणजेच Right to Education Act (आरटीई) अंतर्गत गरीब विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के जागा राखून ठेवण्याची सक्तीही या संस्थांवर लागू होत नाही. अनुदानित संस्थांना विविध आर्थिक सवलती मिळण्याची शक्यता देखील असते.

अल्पसंख्याक दर्जा मिळवण्यासाठी दोन प्रमुख अटी आहेत — संस्थेच्या व्यवस्थापनात किमान ५० टक्के सदस्य संबंधित अल्पसंख्याक समाजातील असावेत आणि विद्यार्थ्यांपैकी किमान ५० टक्के विद्यार्थी त्या समुदायातील असावेत. याच अटींच्या अंमलबजावणीतून अनेक वाद उद्भवले. प्रारंभी या अटी काटेकोरपणे पाळल्या जात होत्या. परंतु कालांतराने शिक्षण क्षेत्रातील काही संस्थाचालकांनी या नियमांतील पळवाटा शोधल्या. व्यवस्थापन मंडळात अल्पसंख्याक सदस्यांची संख्या वाढवणे तुलनेने सोपे होते. मात्र विद्यार्थ्यांच्या ५० टक्के अटीमुळे अडचण निर्माण होत होती. यानंतर राज्यातील काही प्रशासकीय निर्णयांमुळे विद्यार्थ्यांची अट शिथिल करण्यात आली. परिणामी, अल्पसंख्याक दर्जासाठी अर्जांची संख्या झपाट्याने वाढू लागली. २००९ पासून आजपर्यंत महाराष्ट्रात सुमारे सहा हजार शिक्षणसंस्थांना अल्पसंख्याक दर्जा मिळाल्याचे सांगितले जाते. हा आकडा अनेकांना आश्चर्यचकित करणारा आहे. २००९ मध्येच आरटीई कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्यानुसार खासगी शाळांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी काही जागा राखून ठेवणे बंधनकारक आहे. मात्र अल्पसंख्याक दर्जा असलेल्या संस्थांना ही अट लागू होत नाही. त्यामुळे अनेक संस्थांनी अल्पसंख्याक दर्जा मिळवण्याकडे अधिक कल दाखवला, अशी टीका शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांकडून केली जाते. या प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेपाचा प्रश्नही वेळोवेळी पुढे आला. काही मंत्र्यांनी अल्पसंख्याक दर्जाच्या फाइल्स स्वतःच्या मंजुरीशिवाय पुढे जाऊ नयेत असा आदेश दिला होता. मात्र केंद्रीय कायद्यानुसार हा अधिकार प्रामुख्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे असतो. त्यामुळे मंत्री आणि अधिकारी यांच्यात मतभेद निर्माण झाल्याच्या घटनाही घडल्या. काही अधिकाऱ्यांच्या बदल्या, प्रशासकीय तणाव आणि एका अधिकाऱ्याच्या आत्महत्येची घटना यामुळे या विभागातील वातावरण किती तणावपूर्ण होते याची कल्पना येते. या पार्श्वभूमीवर पुढे प्रशासनाने अधिकाऱ्यांना पुन्हा अधिकार देत प्रक्रिया पारदर्शक ठेवण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जाते. अल्पसंख्याक दर्जा देण्यामागील मूळ उद्देश होता तो सामाजिकदृष्ट्या मागास समुदायांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे. परंतु प्रत्यक्षात अनेक संस्थांमध्ये बहुसंख्याक समाजातीलच विद्यार्थी शिकत असल्याचे चित्र दिसते. यामुळे या दर्जाचा मूळ हेतू कितपत साध्य होतो आहे, हा प्रश्न उपस्थित होतो. विशेष म्हणजे २०२१ नंतरच्या चार वर्षांत ज्यांना अल्पसंख्याक दर्जा मिळाला त्या संस्थांपैकी मोठ्या प्रमाणावर संस्था भाषिक अल्पसंख्याकांच्या असल्याचे दिसते. मुस्लीम किंवा ख्रिश्चन समाजाच्या संस्था तुलनेने कमी असल्याचे निरीक्षण काही अभ्यासकांनी नोंदवले आहे. एकदा अल्पसंख्याक दर्जा मिळाल्यानंतर संस्थांना अनेक प्रशासकीय सवलती मिळतात. त्यामुळे काही संस्थाचालकांनी याकडे शिक्षणसेवेपेक्षा व्यवस्थापन सुलभ करण्याचे साधन म्हणून पाहिल्याची टीका केली जाते. शिक्षणक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर ‘शिक्षणसम्राट’ निर्माण होण्यामागे हीच प्रक्रिया कारणीभूत असल्याचा आरोपही काही सामाजिक कार्यकर्ते करतात. अल्पसंख्याक दर्जाबाबतचा वाद हा केवळ राजकीय किंवा प्रशासकीय प्रश्न नाही; तो शिक्षणाच्या गुणवत्तेशी आणि सामाजिक न्यायाशी संबंधित आहे. नियमांचा गैरवापर टाळण्यासाठी अधिक पारदर्शक आणि कडक तपासणी यंत्रणा आवश्यक असल्याची मागणी वाढत आहे.

# मोफत डेटाचा मोह आणि नव्या कराची चाहूल




जगाबरोबर आपणही एकविसाव्या शतकात प्रवेश केला, पण या नव्या युगातही मोफत देण्याची संस्कृती संपली नाही; उलट ती अधिक आधुनिक स्वरूपात पुढे आली. या आधुनिकोत्तर मोफतोत्सवाचे सर्वात ठळक उदाहरण म्हणजे दूरसंचार कंपन्यांकडून देण्यात आलेला ‘मोफत डेटा’. मोबाइल फोन सर्वसामान्यांच्या हातात पोहोचू लागल्यानंतर ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी कंपन्यांमध्ये तीव्र स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेत काही कंपन्यांनी बाजारपेठ पटकन ताब्यात घेण्यासाठी डेटा जवळजवळ मोफतच देण्याची रणनीती अवलंबली.

परिणामी मोबाइल सेवा वापरणाऱ्यांची संख्या प्रचंड वेगाने वाढली. भारतात मोबाइल फोन हा केवळ संवादाचे साधन न राहता मनोरंजन, माहिती, राजकारण आणि सामाजिक चर्चांचा प्रमुख माध्यम बनला. स्वस्त किंवा मोफत डेटामुळे सोशल मीडियावर माहितीचा, अफवांचा आणि चर्चांचा अक्षरशः पूर आला. यामुळे एक नवीन डिजिटल पिढी तयार झाली — जी माहितीचा उपभोग घेते, मत तयार करते आणि शेवटी मतदानाच्या प्रक्रियेत सहभागी होते.

मोफत डेटाच्या या क्रांतीने भारतात इंटरनेटचा प्रसार झपाट्याने वाढवला, हे निर्विवाद आहे. पण त्याचबरोबर माहितीच्या सत्यासत्यतेचा प्रश्नही निर्माण झाला. सोशल मीडियावरून पसरवल्या जाणाऱ्या अफवा, राजकीय प्रचार किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीमुळे समाजातील मतमतांतरे तीव्र झाली. या नव्या डिजिटल वातावरणाने राजकारणालाही वेगळे स्वरूप दिले.

याच पार्श्वभूमीवर आता डेटा वापरावर कर आकारणीचा विचार पुढे येत असल्याचे वृत्त चर्चेत आले आहे. एका उच्चस्तरीय बैठकीत पंतप्रधान Narendra Modi यांनी दूरसंचार क्षेत्रातील महसूलवाढीच्या पर्यायांवर चर्चा करताना डेटा वापरावर कर आकारणीचा प्रस्ताव मांडल्याचे सांगितले जाते. या बैठकीस दूरसंचार मंत्री Jyotiraditya Scindia, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी तसेच **NITI Aayog**चे प्रतिनिधी उपस्थित होते.

या चर्चेनुसार, डेटा वापरणाऱ्यांची ‘चांगल्या’ आणि ‘वाईट’ कामांसाठी वापर करणाऱ्यांमध्ये वर्गवारी करण्याची कल्पनाही मांडली गेल्याचे सांगितले जाते. मात्र चांगले आणि वाईट वापर याची व्याख्या काय असेल, हे अद्याप स्पष्ट नाही. उदाहरणार्थ, सोशल मीडियावर राजकीय प्रचार करणे, एखादा चित्रपट पाहणे किंवा मनोरंजनासाठी डेटा वापरणे — यातील कोणता वापर योग्य आणि कोणता अयोग्य मानला जाईल, हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

**» ज्या वेळी एखाद्यास एखादी गोष्ट मोफत दिली जाते, त्या वेळी त्या मोहाला बळी पडणारे लोकच खरे ‘गिऱ्हाईक’ ठरतात, हे सार्वत्रिक सत्य आहे. आपल्याकडे तर “जे जे मोफत ते ते पौष्टिक” अशी एक वेगळीच सामाजिक मानसिकता दिसून येते. त्यामुळे मोफत देण्याच्या प्रत्येक योजनेला, ऑफरला किंवा घोषणेला लोकांचा प्रतिसादही तितकाच उत्स्फूर्त असतो. विषय राजकारणाचा असो, बाजारपेठेचा असो किंवा ग्राहक संस्कृतीचा — मोफतपणाचे आकर्षण मात्र कायम राहते. ‘एकावर-एक मोफत’पासून ते जनतेच्या पैशातून राबविल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांपर्यंत हा ‘मोफतोत्सव’ आपल्या सार्वजनिक जीवनाचा भाग बनला आहे.**

तथापि सरकारच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा म्हणजे महसूल. भारतात इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या जगातील सर्वाधिक आहे. त्यामुळे डेटा वापरावर अत्यल्प कर जरी आकारला, तरी सरकारी तिजोरीत मोठ्या प्रमाणावर निधी जमा होऊ शकतो. उदाहरणार्थ, एका वर्षात देशातील नागरिकांनी अब्जावधी गिगाबाइट डेटा वापरल्याचे अंदाज आहेत. जर प्रत्येक गिगाबाइटवर केवळ एक रुपया इतकाही कर लावला, तरी हजारो कोटी रुपयांचा महसूल सरकारला मिळू शकतो.

सरकारला विविध कल्याणकारी योजना, पायाभूत सुविधा आणि सामाजिक प्रकल्पांसाठी मोठ्या निधीची गरज असते. वस्तू आणि सेवा करातील (GST) चढउतार, आर्थिक ताण आणि वाढत्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर नवे महसूल स्रोत शोधण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे डेटा वापरावर कर आकारणीचा विचार काहींना व्यवहार्य वाटतो. या बैठकीत दूरसंचार क्षेत्रातील इतर मुद्द्यांवरही चर्चा झाल्याचे वृत्त आहे. विशेषतः सरकारी मालकीच्या Bharat Sanchar Nigam Limited (बीएसएनएल) आणि Mahanagar Telephone Nigam Limited (एमटीएनएल) या कंपन्यांच्या स्थितीचा प्रश्न पुन्हा एकदा पुढे आला. एकेकाळी देशातील दूरसंचार क्षेत्राचे कणा मानल्या जाणाऱ्या या कंपन्या आज खासगी कंपन्यांच्या स्पर्धेत मागे पडल्या आहेत.

खासगी कंपन्यांनी अत्याधुनिक सेवा, स्वस्त योजना आणि मोठ्या गुंतवणुकीच्या जोरावर बाजारपेठ काबीज केली. त्याच वेळी सरकारी कंपन्या प्रशासकीय अडथळे, धोरणात्मक विलंब आणि आर्थिक अडचणींमुळे हळूहळू कमकुवत होत गेल्या. परिणामी दूरसंचार क्षेत्रात खासगी कंपन्यांचे वर्चस्व वाढले.

काही वर्षांपूर्वी केंद्र सरकारने बीएसएनएलला पुन्हा सक्षम करण्यासाठी विविध पावले उचलण्याची घोषणा केली होती. केंद्रीय मंत्री Ashwini Vaishnaw यांनी बीएसएनएलची आधुनिक सेवा सुरू करण्याचा दावा केला होता. मात्र प्रत्यक्षात या योजनांची गती अपेक्षेइतकी दिसून आलेली नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर डेटा वापरावर कर आकारणीचा प्रस्ताव पुढे येणे हे अनेकांना आश्चर्यकारक वाटत असले, तरी त्यामागील आर्थिक तर्क स्पष्ट आहे. सुरुवातीला ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी स्वस्त किंवा मोफत डेटा दिला गेला; त्यानंतर डिजिटल सेवा जीवनाचा अविभाज्य भाग बनल्या; आणि आता त्यातून महसूल मिळवण्याची शक्यता सरकारच्या दृष्टीने आकर्षक ठरत आहे.

शेवटी प्रश्न असा उरतो की मोफतपणाच्या मोहात अडकलेल्या ग्राहकांना या नव्या वास्तवाचा स्वीकार करावा लागेल का? एकदा एखादी सवय समाजात रूजली की ती बदलणे अवघड असते.

# शाळांमध्ये ‘सेफ्टी ऑडिट’ अनिवार्य करा; विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा मुद्दा विधान परिषदेत

### ICC-POSH समित्यांचे ऑडिट व शाळांना सुरक्षा रेटिंग देण्याची मागणी; शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांची सकारात्मक भूमिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड / नागपूर:** राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर मुद्दा विधान परिषदेत ऐरणीवर आला असून “आपली मुलं शाळेत खरोखर सुरक्षित आहेत का?” असा थेट सवाल उपस्थित करत आमदार Amit Gorkhe यांनी शाळांचे ‘सेफ्टी ऑडिट’ अनिवार्य करण्याची मागणी केली. शाळांमध्ये कार्यरत असलेल्या ‘ICC’ आणि ‘POSH’ समित्यांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत या समित्यांचे नियमित ऑडिट करावे आणि शाळांना त्यांच्या सुरक्षा मानकांनुसार रेटिंग द्यावे, अशी क्रांतिकारी मागणी त्यांनी विधान परिषदेत केली.



या संदर्भात आमदार गोरखे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली आहे. शाळांमधील सुरक्षा समित्यांचे कामकाज, विद्यार्थ्यांसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण आणि विविध सुरक्षा मानके याबाबत त्यांनी सविस्तर चर्चा करत शासनाने ठोस धोरण आखावे, असे मत व्यक्त केले.

सभागृहात भूमिका मांडताना आमदार Amit Gorkhe म्हणाले की, अनेक शाळांमध्ये ‘ICC’ आणि ‘POSH’ समित्या अस्तित्वात असल्या तरी त्यांचे कामकाज केवळ कागदोपत्री राहण्याची शक्यता असते. त्यामुळे या समित्यांनी घेतलेल्या निर्णयांचा आणि त्यांच्या अंमलबजावणीचा शासनाने नियमित ‘ऑडिट रिपोर्ट’ घ्यावा. तसेच ज्या पद्धतीने रुग्णालयांना त्यांच्या सेवा व सुविधांच्या आधारे दर्जा दिला जातो, त्याच धर्तीवर शाळांना सुरक्षा मानकांनुसार ‘रेटिंग’ देण्यात यावे. यामुळे पालकांना आपल्या मुलांसाठी सुरक्षित शाळा निवडणे सोपे होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी ‘गुड टच-बॅड टच’ या विषयावरील जनजागृती आणि स्वसंरक्षण प्रशिक्षण हे शालेय अभ्यासक्रमाचा अनिवार्य भाग करावा, अशी मागणीही त्यांनी केली. प्रत्येक शाळेत प्रशिक्षित समुपदेशक (काउन्सलर) असणे बंधनकारक करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांना मानसिक आधार मिळावा आणि कोणत्याही प्रकारच्या अत्याचार किंवा छळाच्या घटनांवर त्वरित मदत मिळावी, यासाठी समुपदेशन सेवा महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

या चर्चेनंतर राज्याचे शालेय शिक्षणमंत्री Dadaji Bhuse यांनी सभागृहात सरकारची भूमिका स्पष्ट करत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी विविध उपाययोजना राबविल्या जात असल्याची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, शाळांच्या परिसरात आणि शाळा बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अनिवार्य करण्यात आले असून शाळेतील कर्मचाऱ्यांची पोलीस पडताळणीही बंधनकारक आहे.

मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने स्वच्छतागृहाजवळ केवळ महिला कर्मचारी नियुक्त करण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच माध्यमिक शाळांमध्ये ‘पिंक रूम’ सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले असून विद्यार्थिनींना आवश्यक गोपनीयता आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

याशिवाय प्रत्येक शाळेत ‘सती सावित्री समिती’ स्थापन करणे, तक्रार निवारण पेटीची व्यवस्था करणे आणि विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे यासारखे उपक्रम राबवले जात असल्याची माहितीही मंत्री Dadaji Bhuse यांनी दिली. राज्यभरातील विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षणही सुरू करण्यात आले असून त्याला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, या विषयावर प्रतिक्रिया देताना आमदार Amit Gorkhe यांनी शिक्षणमंत्र्यांनी घेतलेल्या सकारात्मक भूमिकेचे स्वागत केले. मात्र शाळांमधील सुरक्षा व्यवस्थेबाबत केवळ घोषणा न करता त्यांची कठोर अंमलबजावणी होणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

“पालकांना विश्वास वाटेल अशी सुरक्षित शाळा व्यवस्था निर्माण करणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड करता येणार नाही. त्यामुळे या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करणार आहे,” असेही आमदार गोरखे यांनी यावेळी सांगितले. राज्यातील वाढत्या शालेय सुरक्षेच्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर विधान परिषदेत झालेली ही चर्चा महत्त्वाची मानली जात असून शाळांमधील सुरक्षा व्यवस्थेबाबत अधिक कठोर धोरण राबवले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# एलपीजीला स्वदेशी पर्याय; पुण्यात विकसित झाले ‘डीएमई’ इंधन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** एलपीजीच्या वाढत्या आयातीच्या पार्श्वभूमीवर देशाला स्वदेशी पर्याय उपलब्ध करून देत National Chemical Laboratory (एनसीएल), पुणे येथील शास्त्रज्ञांनी ‘डायमिथिल इथर’ (DME) हे इंधन विकसित केले आहे. हे इंधन एलपीजीला सक्षम पर्याय ठरू शकते आणि स्वयंपाक तसेच वाहन इंधन म्हणूनही त्याचा वापर शक्य असल्याचे संशोधकांनी सांगितले.

एनसीएलचे संचालक Ashish Lele यांनी दिलेल्या माहितीनुसार, ‘डीएमई’ निर्मितीसाठी आवश्यक असलेला विशेष कॅटलिस्ट एनसीएलमध्ये विकसित करण्यात आला आहे. शास्त्रज्ञ Thirumalaiswamy Raja यांच्या नेतृत्वाखाली २००४ पासून या संशोधनाला सुरुवात झाली होती. सुमारे दोन दशकांच्या संशोधनानंतर हे तंत्रज्ञान आता व्यावसायिक उत्पादनाच्या टप्प्यावर पोहोचले आहे. या प्रक्रियेत बायोमासपासून मिथेनॉल तयार करून त्यावर रासायनिक प्रक्रिया केल्यानंतर ‘डीएमई’ मिळते. यापूर्वी एनसीएलमध्ये प्रायोगिक तत्त्वावर दररोज १२ किलो उत्पादन करण्यात आले होते.

# बालकांच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी ‘डिजिटल कवच’उभारणे काळाची गरज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** तंत्रज्ञानाचा सुरक्षित आणि जबाबदार वापर सुनिश्चित करत बालकांसाठी सुरक्षित डिजिटल वातावरण निर्माण करण्यासाठी ‘डिजिटल कवच’ उभारण्याची गरज असल्याचे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले.



बालकांच्या सुरक्षिततेसह डिजिटल युगातील आव्हानांचा सामना करण्यासाठी “महा-संकल्प : सुरक्षितता, शिक्षण आणि शाश्वत डिजिटल भारत” या नेतृत्व संवादाचे आयोजन करण्यात आले होते. महिला व बालविकास विभाग, कार्यक्रमात बोलताना मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, भारतात सुमारे ४४ कोटी मुले १८ वर्षांखालील आहेत. ‘विकसित भारत @२०४७’ या ध्येयाकडे वाटचाल करताना बालकांचा सर्वांगीण विकास आणि सुरक्षितता केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे.

इंटरनेटचा वाढता वापर, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विविध डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे मुलांना शिक्षण व नवोपक्रमाच्या संधी मिळत असल्या तरी सायबर बुलिंग, ऑनलाइन ग्रूमिंग, हानिकारक सामग्री आणि गेमिंग व्यसन यांसारखी आव्हानेही वाढत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. बालसंरक्षणासाठी राज्य सरकारकडून ‘चाइल्ड-फ्रेंडली मोबाईल व्हॅन स्क्वॉड’ सुरू करण्यात आले असून रस्त्यावर राहणाऱ्या आणि असुरक्षित बालकांपर्यंत पोहोचून त्यांना समुपदेशन, शिक्षण आणि पुनर्वसनाच्या सेवांशी जोडण्याचे काम या पथकांद्वारे केले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच ‘वेब सेफ अँड वाईज’ उपक्रमांतर्गत १२ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन सुरक्षितता, गोपनीयता आणि जबाबदार डिजिटल वापराबाबत मार्गदर्शन केले जात आहे.

### महापालिकेद्वारे वर्षभराच्या उपक्रमांचे आगाऊ नियोजन करण्याचा निर्णय; खेळाडूंसाठी सुविधा

# क्रीडा, कला, सांस्कृतिक व साहित्य उपक्रमांसाठी सर्वसमावेशक धोरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील क्रीडा, कला, सांस्कृतिक व साहित्यिक उपक्रम अधिक प्रभावी आणि नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा, कला, सांस्कृतिक व साहित्य समितीचे सर्वसमावेशक धोरण तयार करण्यात येणार आहे. समितीच्या वर्षभराच्या उपक्रमांचे आगाऊ नियोजन करून सर्व सदस्यांच्या सहमतीने धोरण निश्चित केले जाईल. त्याच आधारे पुढील काळात समितीचे कामकाज आणि विविध कार्यक्रम राबविण्यात येतील, अशी माहिती समितीचे सभापती Kailas Kute यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत माजी महापौर मधुकरराव पवळे सभागृहात क्रीडा, कला, सांस्कृतिक व साहित्य समितीची बैठक सभापती Kailas Kute यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. शहरातील क्रीडा, सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनबद्ध कामकाज आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या बैठकीस महापालिकेचे विरोधी पक्षनेते तथा समिती सदस्य Bhausaheb Bhoir, जितेंद्र ननावरे, शाम जगताप, तानाजी बारणे, धर्मपाल तंतरपाळे, उदय गायकवाड, योगेश लांडगे, प्रमोद कुटे यांच्यासह नगरसचिव मुकेश कोळप, उपआयुक्त पंकज पाटील, चेतना केरूरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आणि महापालिका कर्मचारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान क्रीडा विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शहरातील महापालिकेच्या सर्व जलतरण तलावांमधील पाण्याची गुणवत्ता राखण्यासाठी प्रत्येक तलावातील पाण्यातील क्लोरीनची पातळी नियमित तपासण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच नागरिकांना स्पष्ट माहिती मिळावी यासाठी संबंधित जलतरण तलावांवर आवश्यक सूचनाफलक लावण्याचे निर्देश देण्यात आले.

क्रीडा विभागाच्या सध्याच्या धोरणाचा सविस्तर अहवाल समितीसमोर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. समिती सदस्यांकडून त्याचा अभ्यास करून आवश्यक ते बदल सर्व सदस्यांच्या संमतीने करण्यात येतील, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले. समितीच्या वर्षभराच्या उपक्रमांचे नियोजन आगाऊ तयार करून त्यासंदर्भात ठराव मंजूर करण्यावरही भर देण्यात आला. शहरातील सांस्कृतिक क्षेत्राला चालना देण्यासाठी महापालिकेच्या नाट्यगृहांमध्ये स्थानिक कलाकारांना प्राधान्य देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. नाट्यगृहांमध्ये शहरातील उल्लेखनीय कलाकार, कलावंत आणि सांस्कृतिक क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या व्यक्तींची छायाचित्रे लावण्याची सूचना करण्यात आली. शहरात विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांसाठी येणाऱ्या खेळाडूंच्या निवासाची योग्य सोय उपलब्ध व्हावी यासाठी खेळाडूंसाठी स्वतंत्र वसतीगृह उभारण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला. तसेच पिंपरी-चिंचवड शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम उभारण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज बैठकीत व्यक्त करण्यात आली. नेहरूनगर येथील आण्णासाहेब मगर स्टेडियमच्या प्रलंबित कामांना गती देण्यावर भर देण्यात आला. शहरातील क्रीडापटूंना अधिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी महापालिकेच्या सर्व शाळांमधील मैदाने सुट्टीच्या दिवशी मुलांसाठी खेळण्यासाठी खुली करण्याबाबतही सकारात्मक भूमिका घेण्यात आली.

# ई-रिक्षा व ई-बाईकसाठीही परवाना (परमिट) बंधनकारक करण्याचा निर्णय-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** राज्यात रिक्षा आणि टॅक्सींसाठी नवीन परमिट देण्याची प्रक्रिया गेल्या दोन दिवसांपासून तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. प्रवासी वाहतूक करणाऱ्या ई-रिक्षा व ई-बाईकना यापुढे मोटार वाहन विभागाकडे रितसर नोंदणी करुन परवाना घेणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, आतापर्यंत इलेक्ट्रिक रिक्षांना (ई-रिक्षा) प्रवासी वाहतुकीसाठी स्वतंत्र परमिट घेण्याची सक्ती नव्हती. मात्र, वाढत्या ई-वाहनांच्या संख्येचा विचार करता केंद्र शासन अधिसूचना क्र. का. आ. २८१२ (अ) दि. ३०/०६/२०१६ अन्वये प्रवासी वाहतुकीत एकसमान नियम लागू करण्यासाठी ई-रिक्षा व ई-बाईक साठीही परमिट (परवाना ) प्रक्रिया बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

या निर्णयामुळे पारंपरिक रिक्षा, टॅक्सी आणि इलेक्ट्रिक रिक्षा या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी समान नियम लागू राहतील. प्रवासी वाहतुकीच्या व्यवस्थेत पारदर्शकता वाढविणे आणि अनियमितता टाळणे हा यामागील उद्देश असल्याचे मंत्री सरनाईक म्हणाले. दरम्यान, परमिट प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी परिवहन विभागाकडून “एक खिडकी योजना” सुरू करण्याची तयारी सुरू आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पैसे मागितल्याने महिलेला मारहाण

**दौंड :** उसने दिलेले पैसे परत मागितल्याच्या कारणावरून एका महिलेला भररस्त्यात बेदम मारहाण केल्याची घटना Kurkumbh येथील भोंगळे वस्ती परिसरात शुक्रवारी रात्री घडली. या प्रकरणी संगीता मारुती पवार (वय ३२) या महिलेला मारहाण करण्यात आली. आरोपी श्रावण गुलीक, त्याची आई उजा गुलीक आणि पायल (पूर्ण नाव अज्ञात) यांनी दगड, चप्पल व हाताने मारहाण केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात पवार जखमी झाल्या असून तिघांविरोधात पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वाघमारे करत आहेत.

### भिगवण-भादलवाडी सर्व्हिस रस्त्यावर भीषण अपघात

**भिगवण :** भिगवण-भादलवाडी सर्व्हिस रस्त्यावर बिल्ट कंपनी गेटसमोर झालेल्या भीषण अपघातात मोटारसायकलस्वाराचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या अपघातात अजित दादू वाळके (वय ५४, रा. भिगवण) यांचा मृत्यू झाला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ११ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास अजित वाळके हे त्यांच्या मोटारसायकलवरून (एमएच ४५ एल ५९८०) भिगवणकडे येत होते. यावेळी भिगवण-भादलवाडी सर्व्हिस रस्त्यावर बिल्ट कंपनी कॉलनी गेटसमोर अज्ञात भरधाव वाहनाने त्यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की वाळके यांच्या पोटासह शरीराच्या विविध भागांवर गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत जखमी अवस्थेत असलेल्या वाळके यांना तातडीने भिगवण येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. भिगवण-भादलवाडी मार्गावर वारंवार अपघात घडत आहेत.

### वाहनांच्या ४ किमी लांब रांगा; शिरोली फाट्याजवळ लग्नसराईमुळे वाढलेली वाहतूक

# पुणे-नाशिक महामार्गावर भीषण वाहतूक कोंडी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण :** लग्नसराईचा हंगाम सुरू झाल्याने पुणे आणि मुंबईकडून ग्रामीण भागाकडे जाणाऱ्या नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून त्याचा परिणाम पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतुकीवर होताना दिसत आहे. वाढत्या वाहतुकीमुळे चाकण ते खेड दरम्यानच्या शिरोली फाटा परिसरात मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली असून वाहनांच्या तब्बल २ ते ४ किलोमीटरपर्यंत लांब रांगा लागल्या आहेत. या कोंडीमुळे वाहनचालक आणि प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारच्या कडक उन्हात अनेक प्रवासी आपल्या वाहनांमध्ये अडकून पडले होते. काही वाहनांना काही मीटर पुढे सरकण्यासाठीही बराच वेळ प्रतीक्षा करावी लागत होती. त्यामुळे विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागल्याचे प्रवाशांनी सांगितले.

चाकण परिसरात वाहतूक कोंडीची समस्या नवीन नसली तरी गेल्या काही महिन्यांत ही समस्या अधिक गंभीर होत चालल्याचे चित्र आहे. चाकण औद्योगिक वसाहतीमुळे या मार्गावर अवजड वाहने आणि मालवाहतुकीची मोठी वर्दळ असते. त्यातच लग्नसराईचा हंगाम सुरू झाल्याने खासगी वाहने, बस आणि इतर वाहनांची संख्या वाढल्याने महामार्गावरील वाहतुकीचा ताण अधिक वाढला आहे. या शिवाय राजगुरुनगर परिसरातही वारंवार वाहतूक कोंडी होत असल्याने स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांकडून वाहतूक व्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. महामार्गावर वाढत्या वाहनसंख्येच्या तुलनेत वाहतूक नियोजन आणि नियंत्रण अपुरे असल्याचेही काही वाहनचालकांनी सांगितले. दरम्यान, स्थानिकांच्या मते कोंडी वाढल्यानंतर बराच वेळ वाहतूक पोलीस घटनास्थळी पोहोचले नव्हते. त्यामुळे वाहतुकीची परिस्थिती अधिकच बिघडली. योग्य नियोजन, सिग्नल व्यवस्थापन आणि वाहतूक नियंत्रणासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

वाहतूक कोंडीमुळे काही प्रवाशांना नियोजित कार्यक्रमांना उशीर झाला तर काहींना तासन्तास वाहनांमध्येच थांबावे लागले. परिणामी अनेकांनी प्रशासनाने या मार्गावरील वाहतुकीचे नियोजन अधिक प्रभावीपणे करण्याची गरज व्यक्त केली. दरम्यान, या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी शक्य असल्यास पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन स्थानिकांकडून करण्यात आले आहे. महामार्गावरील वाहतूक कधी सुरळीत होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून प्रवाशांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे.

## लोणी काळभोरमध्ये दावत-ए-इफ्तारमधून हिंदू-मुस्लीम ऐक्याचे दर्शन




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी काळभोर :** पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने लोणी काळभोर येथे आयोजित करण्यात आलेल्या दावत-ए-इफ्तार कार्यक्रमातून हिंदू-मुस्लीम ऐक्याचे सुंदर चित्र पाहायला मिळाले. ह. बागूलशहा वली दर्गा ट्रस्ट आणि शेर-ए-हिंद फ्रेंड सर्कल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात विविध समाजघटकांतील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. या उपक्रमातून सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि एकोप्याचा संदेश देण्यात आला. रमजान महिन्यातील उपवास सोडण्याच्या पवित्र क्षणी आयोजित करण्यात आलेल्या या इफ्तार कार्यक्रमात हिंदू आणि मुस्लीम बांधवांनी एकत्र येत इफ्तार घेतला. परस्परांना शुभेच्छा देत सौहार्द आणि एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले. धर्म वेगळे असले तरी माणुसकी एकच असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. या कार्यक्रमाला प्रिंट व डिजिटल पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र काळभोर, हवेली कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती सनी काळभोर, लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक योगेश पैठणे, पोलीस हवालदार रवी आहेर, आलमगीर जामा मशिदीचे अध्यक्ष फैयजभाई इनामदार यांच्यासह रशीद इनामदार, नईम इनामदार, समीर इनामदार, बाबूलाल इनामदार, अब्दुलभाई अक्कलकोटकर, अप्पासाहेब काळभोर, ॲड. सुजित कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. याशिवाय परिसरातील अनेक हिंदू व मुस्लीम बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## जुन्नर जिल्हा न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

### प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्याचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**जुन्नर :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि Maharashtra State Legal Services Authority, मुंबई यांच्या निर्देशानुसार राज्यभरातील जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच अनुषंगाने १४ मार्च २०२६ रोजी District and Sessions Court Junnar येथेही राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या लोकअदालतीत आपली प्रकरणे ठेवू इच्छिणाऱ्या पक्षकारांनी न्यायालयाशी किंवा **Junnar Taluka Legal Services Committee**शी संपर्क साधून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष S. B. Shelar यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे.

जुन्नर तालुक्यातील दाखलपूर्व तसेच न्यायालयात प्रलंबित असलेल्या विविध प्रकरणांचा सामंजस्याने आणि जलद निपटारा करण्याच्या उद्देशाने या राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीत विज व पाणी बिल देयके, बँक कर्ज वसुली प्रकरणे, मोटार वाहन अपघात दावे, कौटुंबिक वाद, मालमत्ता विवाद, कर्मचारी नुकसानभरपाई प्रकरणे तसेच तडजोडीने निकाली काढता येणारी इतर दिवाणी व फौजदारी स्वरूपाची प्रकरणे हाताळली जाणार आहेत.

लोकअदालतीच्या माध्यमातून प्रकरणांचा जलद आणि सामंजस्याने निपटारा होत असल्याने दोन्ही पक्षांचा विजय मानला जातो. यामध्ये न्यायालयीन शुल्क परत मिळण्याची तरतूद असल्याने पक्षकारांचा आर्थिक भारही कमी होतो. तसेच वेळेची बचत, कमी खर्च आणि त्वरीत न्याय मिळण्याची संधी उपलब्ध होत असल्यामुळे नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## राज्यस्तरीय इतिहास प्रज्ञाशोध परीक्षेत चैतन्य विद्यालयाचे घवघवीत यश

### ओतूर येथील विद्यार्थ्यांची प्रथम श्रेणीत चमक; शिक्षक व ग्राम विकास मंडळाकडून कौतुक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील ग्राम विकास मंडळ संचलित चैतन्य विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय इतिहास प्रज्ञाशोध परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशाबाबतची माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

स्पर्धा परीक्षेचे समन्वयक भाऊसाहेब खाडे यांनी सांगितले की, इतिहास शिक्षक महामंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दरवर्षी जानेवारी महिन्यात राज्यस्तरीय इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा आयोजित केली जाते. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी या परीक्षेत सहभागी होतात. यंदाची परीक्षा जानेवारी २०२६ मध्ये पार पडली होती. चैतन्य विद्यालयातील एकूण २५५ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग नोंदवला होता. स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने ही परीक्षा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. नुकताच जाहीर झालेल्या निकालात विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवत विद्यालयाचा नावलौकिक वाढवला. इयत्ता पाचवी, सहावी, सातवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या विद्यार्थ्यांमध्ये पियुष बोराडे, अविष्कार डुंबरे, आयुष गायकर, कृष्णा गेंगजे, स्वयंभू घोडेकर, स्वानंद साठे, साईराज सतविडकर, स्वरा धुमाळ, राजनंदिनी घोलप, रुद्र जाधव, वीर जायभाये, स्पंदन घुले, आरुष कांबळे, वरद डोंगरे, स्नेहा डुंबरे, युवराज खेत्री, हर्ष वामन, वरद नलावडे, स्वरूप साठे तसेच दहावीतील संस्कृती अहिनवे, आदित्य बोरुडे, आदिती ढमाले, ओम डुंबरे, नंदन घोलप, आराध्या गिते, तन्वी पंडोरे, सायली पानसरे, शिवानी रघतवान, सोहम रंधे, ध्रुवी शेटे, अनुष्का शिंदे, सान्वी थोरात आदी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या सर्व विद्यार्थ्यांना उपमुख्याध्यापक संजय हिरे तसेच शिक्षक सोनाली कांबळे, अजित डांगे, अमित झरेकर, दिनेश ताठे, बाळासाहेब साबळे आणि आशा डुंबरे यांनी मार्गदर्शन केले.

## रांजणगाव सोसायटीच्या अध्यक्षपदी सतीश शेळके बिनविरोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणगाव गणपती :** शिरूर तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या रांजणगाव गणपती येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी Satish Fakkad Shelke यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सोसायटीच्या कार्यालयात पार पडलेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत ही निवड जाहीर करण्यात आली.

मावळते अध्यक्ष Goraksh Gadade यांनी पूर्वनियोजित निर्णयानुसार अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर ही जागा रिक्त झाली होती. त्यानंतर झालेल्या निवड प्रक्रियेत सतीश शेळके यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शेळके यांच्या निवडीमुळे सोसायटीच्या कारभाराला नवे नेतृत्व मिळाले आहे.

निवडीनंतर त्यांचा सत्कार जिल्हा परिषद सदस्या Swati Pachundkar यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी सोसायटीचे संचालक, ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून Prashant Pisal यांनी काम पाहिले. त्यांना सोसायटीचे सचिव Dilip Punekar यांनी सहकार्य केले. दरम्यान, सोसायटीच्या माध्यमातून शेतकरी व सभासदांच्या हितासाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्याचा प्रयत्न करणार असल्याची प्रतिक्रिया नवनिर्वाचित अध्यक्ष सतीश शेळके यांनी यावेळी व्यक्त केली.

## पुणे विमानतळावर 'APTMO' टपाल कार्यालयाचा शुभारंभ

### टपाल विभाग व विमानतळ प्रशासनातील समन्वय वाढणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे विमानतळाच्या आवारात आरएमएस 'बी' मंडळ, पुणे यांच्या अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या Airport Transit Mail Office (APTMO) या नव्या कार्यालयाचे उद्घाटन उत्साहात पार पडले. या कार्यालयाच्या स्थापनेमुळे टपाल विभाग आणि विमानतळ प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक बळकट होणार असून विमानतळाशी संबंधित टपाल सेवांची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

या कार्यालयाचे उद्घाटन Abhijit Bansode (निदेशक डाक सेवा, पुणे विभाग) यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी Santosh Dhoke (डायरेक्टर, पुणे विमानतळ), Pradeep Kumar Singh (संयुक्त जनरल प्रबंधक, पुणे विमानतळ), B. P. Erande (अधीक्षक, आरएमएस 'बी' विभाग, पुणे) तसेच Y. R. Walunjkar (मॅनेजर बीडीजी, पुणे) यांच्यासह टपाल विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि निमंत्रित मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून नव्या APTMO कार्यालयाच्या स्थापनेचे महत्त्व अधोरेखित केले. विमानतळाशी संबंधित टपाल सेवांचे नियोजन, समन्वय आणि व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे पार पाडण्यासाठी हे कार्यालय महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नवीन कार्यालयामुळे टपाल विभाग आणि विमानतळ प्रशासन यांच्यातील संवाद अधिक सुलभ होणार आहे. परिणामी विमानतळावरील टपाल सेवा अधिक सुरळीत आणि कार्यक्षम होण्यास मदत होईल. याशिवाय, या ठिकाणी सर्व प्रकारच्या पोस्टल आर्टिकल्स व पार्सल बुकिंगसाठी स्वतंत्र काउंटर सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले असून येत्या काही दिवसांत ही सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध होणार आहे. या सुविधेमुळे पुणे विमानतळ परिसरातील नागरिक, प्रवासी तसेच व्यावसायिकांना टपाल व पार्सल सेवा अधिक सोयीस्करपणे मिळणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी Ganesh Wadorkar (सहायक अधीक्षक, पुणे) यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

## पीएमपीएमएल बस सेवा दौंडपर्यंत वाढवण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दौंड :** पुणे महानगर परिवहन महामंडळाची (पीएमपीएमएल) हडपसर ते कुरकुंभ व पाटसपर्यंत सुरू असलेली बस सेवा पुढे दौंडपर्यंत वाढवावी, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र राज्य अपंग आणि दिव्यांग संघटनेचे सरचिटणीस Rameshwar Mantri यांनी केली आहे. याबाबतचे लेखी निवेदन दौंडचे आमदार Rahul Kul यांना देण्यात आले आहे.

निवेदनात मंत्री यांनी नमूद केले आहे की, दौंड हे महत्त्वाचे रेल्वे जंक्शन असतानाही पुण्याकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी पुरेशी व सोयीस्कर वाहतूक व्यवस्था उपलब्ध नाही. दौंड येथून दररोज हजारो नागरिक नोकरी, व्यवसाय, शासकीय कार्यालये, शिक्षण, व्यापार तसेच वैद्यकीय कारणांसाठी पुण्याकडे प्रवास करतात. मात्र, बारामती डेमू वगळता पुण्याकडे जाण्यासाठी इतर सोयीस्कर रेल्वे सेवा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

एक्सप्रेस गाड्यांमध्ये अतिरिक्त डबे न लावल्यामुळे प्रवाशांना खचाखच गर्दीतून प्रवास करावा लागत आहे. याशिवाय कोरोना काळात बंद करण्यात आलेल्या काही रेल्वे गाड्या अद्याप सुरू झालेल्या नसल्याने प्रवाशांची गैरसोय वाढली आहे. दौंड शहरासह परिसरातील काष्टी, श्रीगोंदा आदी भागांतील प्रवासीही पुण्याला जाण्यासाठी दौंड येथे येऊन पुढील प्रवास करतात. दरम्यान, पीएमपीएमएलने पुणे ते राहू, पारगाव तसेच हडपसर ते कुरकुंभ अशा मार्गांवर बससेवा सुरू केली असून या सेवेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे ही बससेवा पुढे दौंडपर्यंत सुरू केल्यास प्रवाशांची मोठी सोय होईल, असे मंत्री यांनी नमूद केले आहे.

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयुष्यभर केलेल्या शैक्षणिक सेवेचा मान्यवरांकडून गौरव

# शिवनेर भूषण विनायक खोत सरांचा सेवानीवृत्ती गौरव सोहळा उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयुष्यभर निष्ठेने कार्य करणारे 'शिवनेर भूषण' Vinayak Khot सर यांच्या सेवानीवृत्ती निमित्त आयोजित करण्यात आलेला गौरव सोहळा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. पिंपळवंडी संचलित न्यू इंग्लिश स्कूल, खामगाव (ता. जुन्नर, जि. पुणे) येथे दीर्घकाळ प्रामाणिकपणे शैक्षणिक सेवा बजावत विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या खोत सरांनी आपल्या कार्यकाळात शिक्षणासोबतच समाजसेवेचा आदर्श निर्माण केला.

या कार्यक्रमाला विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुणे म्हणून Sachin Joshi (सदस्य, गड किल्ले समिती, महाराष्ट्र शासन व प्रख्यात अभ्यासक) उपस्थित होते. तसेच Milind Kshirsagar, Sharad Sonawane, Atul Benke यांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या. त्यांच्या वतीने प्रतिनिधी म्हणून Amit Benke कार्यक्रमाला उपस्थित होते. याशिवाय Satyashil Sherkar, Vandana Behenji, Ganpatrao Phulawade, Ashok Kakade, Ashok Lande आणि Ashok Gholap आदी मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली. या प्रसंगी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून खोत सरांच्या प्रदीर्घ सेवाकाळातील कार्याचा गौरव केला. विद्यार्थ्यांना दिलेले संस्कार, शिक्षणातील प्रामाणिकता आणि समाजाबद्दलची बांधिलकी यांचा विशेष उल्लेख करण्यात आला. साधेपणा, नम्रता आणि कर्तव्यनिष्ठा या गुणांच्या बळावर खोत सरांनी अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवले असून त्यांचे कार्य पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमादरम्यान खोत सरांचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित माजी विद्यार्थी, सहकारी शिक्षक आणि ग्रामस्थांनी आपल्या भावना व्यक्त करत त्यांच्या कार्याची कृतज्ञतेने आठवण केली. अनेकांच्या डोळ्यांत या क्षणी भावनांचा ओलावा दिसून आला.

कर्तव्यपूर्तीचा अभिमान आणि आठवणींचा अमूल्य ठेवा घेऊन नव्या आयुष्याच्या प्रवासाला निघालेल्या खोत सरांना सर्वांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. शिक्षण क्षेत्रात त्यांनी केलेले योगदान आणि विद्यार्थ्यांवर केलेले संस्कार यामुळे हा सेवानीवृत्ती गौरव सोहळा उपस्थितांसाठी संस्मरणीय ठरला.

## आखाती देशांतील युद्धाचा परिणाम; आंबेगावातील केटरिंग व्यवसाय अडचणीत

**पारगाव :** आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता ग्रामीण भागातील व्यवसायांवरही जाणवू लागला आहे. Ambegaon Taluka येथे लग्नसराईचा हंगाम सुरू असताना स्वयंपाकासाठी लागणाऱ्या गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याने केटरिंग व्यावसायिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

तालुक्यातील अनेक केटरर्सनी लग्नसमारंभांसाठी महिनाभर ते दीड महिन्यापूर्वीच ऑर्डर बुकिंग घेतलेले आहे. लग्नातील जेवणावळीची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर असते. मात्र गेल्या चार-पाच दिवसांपासून स्वयंपाकासाठी लागणारा गॅस उपलब्ध होत नसल्याने त्यांच्यासमोर मोठे संकट उभे राहिले आहे. लग्न समारंभाचे नियोजन आधीच ठरलेले असल्याने लग्नमालक कोणतेही कारण ऐकून घेण्यास तयार नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

मंचर येथील तिरुपती केटरर्सचे संचालक Sandeep Gaikwad यांनी सांगितले की, "आमच्याकडे अनेक ऑर्डर आधीच बुक झालेल्या आहेत. मात्र काही दिवसांपासून गॅस मिळत नसल्याने मोठी अडचण निर्माण झाली आहे. परिस्थिती समजावून सांगितली तरी लग्नमालक कारण ऐकून घेत नाहीत." गॅस टंचाईमुळे सध्या काळ्या बाजारातून सिलिंडर खरेदी करण्याची वेळ केटरर्सवर आली आहे. १४ किलोच्या सिलिंडरसाठी सुमारे ३६०० रुपये तर कमर्शियल गॅस टाकीसाठी साडेपाच हजार रुपये मोजावे लागत आहेत.

## सारांश वृत्त

### मेटामध्ये मोठी नोकरकपात? २०% कर्मचाऱ्यांवर गंडांतर

**नवी दिल्ली :** लोकप्रिय सोशल मीडिया प्लॅटफॉर्म फेसबुक, इन्स्टाग्रामची मूळ कंपनी मेटा प्लॅटफॉर्म लवकरच मोठ्या प्रमाणात कर्मचारी कपात करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. वृत्तसंस्था रिटर्नसच्या अहवालानुसार, कंपनी सुमारे २० टक्के कर्मचाऱ्यांना कमी करण्याचा विचार करत आहे. मेटामध्ये सध्या सुमारे ७९ हजार कर्मचारी कार्यरत असून या निर्णयामुळे १५ हजारांहून अधिक नोकऱ्यांवर संकट येऊ शकते. कंपनीचे प्रमुख मार्क झुकेरबर्ग एआय पायाभूत सुविधांवर अधिक गुंतवणूक करत असून भविष्यात तंत्रज्ञान आणि अल्गोरिदमवर आधारित 'लीन' कंपनी उभारण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचे सांगितले जात आहे.

### जेट इंधन दरवाढीचा फटका; इंडिगोने लावला इंधन अधिभार

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेतील वाढत्या भू-राजकीय तणावामुळे कच्च्या तेलाच्या आणि जेट इंधनाच्या किमतीत मोठी वाढ झाली असून त्याचा परिणाम हवाई प्रवासावर होऊ लागला आहे. देशातील प्रमुख विमान कंपनी इंडिगोने देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय उड्डाणांवर इंधन अधिभार लावण्याचा निर्णय घेतला आहे. हा अतिरिक्त शुल्क १४ मार्च रोजी रात्री १२.०१ वाजल्यापासून लागू होणार असून त्यानंतर केलेल्या सर्व बुकिंगवर आकारला जाणार आहे.

### रक्तदात्यांच्या यादीतून काही गट वगळण्याचे समर्थन

**नवी दिल्ली :** रक्तदात्यांच्या संभाव्य यादीतून तृतीयपंथी, पुरुषांशी लैंगिक संबंध ठेवणारे पुरुष एमएसएम आणि देहविक्रय करणाऱ्या महिलांना वगळण्याच्या निर्णयाचे भारत सरकारने समर्थन केले आहे. हा निर्णय भेदभावपूर्ण नसून वैज्ञानिक अभ्यासांवर आधारित असल्याचे केंद्राने सर्वोच्च न्यायालयासमोर स्पष्ट केले. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भारती यांनी सांगितले की, राष्ट्रीय रक्त धोरण सुरक्षित रक्तपुरवठ्यावर लक्ष केंद्रित करते.

## नुकसानभरपाई आणि भविष्यात हल्ला न करण्याची हमी

# सिजफायरसाठी इराण तयार; ट्रम्प यांच्या भूमिकेमुळे पेच

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेत सुरू असलेल्या इराण-इस्रायल युद्धामुळे तणाव शिगेला पोहोचला असतानाच इराणकडून युद्धविरामाबाबत मोठे संकेत मिळाले आहेत. मात्र युद्ध थांबवण्यासाठी Iran ने United States आणि Israel समोर दोन कठोर अटी ठेवल्यामुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनली आहे. त्यामुळे युद्धविरामाचा मार्ग अजूनही अनिश्चित असल्याचे चित्र आहे.

सध्या सुरू असलेल्या संघर्षाला जवळपास पंधरा दिवस पूर्ण झाले आहेत. या कालावधीत दोन्ही बाजूंनी हवाई आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांची मालिका सुरू असून मध्यपूर्वेत मोठा तणाव निर्माण झाला आहे. या संघर्षाचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवरही दिसू लागला आहे. विशेषतः आखाती देशांकडून होणाऱ्या कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्याने अनेक देशांमध्ये इंधनटंचाईची भीती व्यक्त केली जात आहे. याचा परिणाम भारतासह अनेक देशांवर होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.


युद्धाच्या पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला कोणतीही अट न ठेवता शरण येण्याचा सल्ला दिला होता. "इराणने बिनशर्त आत्मसमर्पण केल्यास युद्ध थांबवता येईल आणि देशात नव्या नेतृत्वाची निवड केली जाईल," असे ट्रम्प यांनी म्हटले होते. मात्र इराणने त्याला तीव्र प्रत्युत्तर देत "आम्ही कधीही शरण जाणार नाही," अशी भूमिका घेतली होती.

दरम्यान, इराणचे माजी कमांडर मोहसेन रेझाई यांनी युद्धविरामाबाबत महत्त्वाचे विधान केले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, युद्ध थांबवण्यासाठी इराण दोन अटींवर तयार आहे. पहिली अट म्हणजे युद्धात इराणचे जेवढे नुकसान झाले आहे त्याची भरपाई अमेरिका आणि इस्रायलने करावी. दुसरी अट म्हणजे भविष्यात इराणवर पुन्हा कधीही हल्ला केला जाणार नाही, याची ठोस आंतरराष्ट्रीय हमी दिली जावी.

इराणच्या या अटींमुळे अमेरिका आणि इस्रायलसमोर मोठे राजनैतिक आव्हान उभे राहिले आहे. विशेषतः ट्रम्प यांनी यापूर्वी इराणचा पूर्ण पराभव करण्याचा इशारा दिला असल्यामुळे या अटी स्वीकारणे त्यांच्यासाठी राजकीयदृष्ट्या कठीण ठरू शकते. त्यामुळे इराणच्या प्रस्तावाला अमेरिका आणि इस्रायल कसा प्रतिसाद देतात, याकडे आता संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, मध्यपूर्वेतील वाढत्या तणावामुळे जागतिक राजकारण आणि ऊर्जा बाजारपेठेवर मोठा परिणाम होत आहे. युद्धविरामाचा मार्ग निघतो का, की संघर्ष आणखी तीव्र होतो, हे पुढील काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

## होर्मुझ संकटात भारताला तेल महाग; रशियाने वाढवले दर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मॉस्को :** मध्यपूर्वेत सुरू असलेल्या इराण-इस्रायल संघर्षामुळेमुळे जागतिक ऊर्जा बाजारात मोठी उलथापालथ झाली आहे. स्ट्रट ऑफ होर्मुझ मार्गावरील तणाव आणि वाहतुकीत अडथळे निर्माण झाल्यामुळे खनिज तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम झाला असून अनेक देशांसमोर इंधन संकट उभे राहिले आहे.

या पार्श्वभूमीवर भारताने ने पर्यायी पुरवठ्यासाठी रशीयाकडून तेल खरेदी वाढवली आहे. मात्र संकटाच्या काळात रशियाने भारताला दिली जाणारी सवलत बंद केल्याने भारताला तेल महाग दराने घ्यावे लागत असल्याचे समोर आले आहे. यापूर्वी रशिया भारताला सुमारे ५० डॉलर प्रति बॅरल दराने तेल पुरवत होता. परंतु पश्चिम आशियातील तणाव वाढल्यानंतर दरात मोठी वाढ झाली असून आता भारताला जवळपास ९० डॉलर प्रति बॅरल दराने तेल खरेदी करावे लागत असल्याची माहिती अमेरिकेचे माजी ऊर्जा सल्लागार अमोस हॉचस्टेन यांनी दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, इराणशी संबंधित युद्धजन्य परिस्थितीनंतर भारताने रशियाकडे अधिक तेलासाठी संपर्क साधला. मात्र वाढत्या मागणीचा फायदा घेत रशियाने कोणतीही सवलत न देण्याची भूमिका घेतली. त्यामुळे भारतासाठी तेल खरेदी अधिक खर्चिक ठरू लागली आहे. दरम्यान, अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही महिन्यांपूर्वी भारतासोबत व्यापार करार करताना रशियाकडून होणारी तेल खरेदी कमी करण्याची अट घातली होती.

## अमेरिकेत भारतीयांच्या ज्वेलरी दुकानावर धाडसी दरोडा; २० चोरांनी ३० सेकंदांत १५ कोटींची लूट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**फ्रेमोंट (अमेरिका) :** अमेरिकेतील फ्रेमोंट शहरात भारतीय वंशाच्या कुटुंबाच्या ज्वेलरी दुकानावर अत्यंत धाडसी दरोडा टाकण्यात आला. मुखवटे घातलेल्या सुमारे २० दरोडेखोरांनी अवघ्या काही सेकंदांत दुकानातील सुमारे १५ कोटी रुपयांहून अधिक किमतीचे दागिने लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

ही घटना कुमार ज्वेलर्स या भारतीय-अमेरिकन कुटुंबाच्या मालकीच्या दुकानात घडली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये हुडी आणि मास्क घातलेले दरोडेखोर अचानक दुकानात घुसताना दिसतात. त्यांनी हातोडे आणि इतर साधनांच्या मदतीने काचेचे शोकेस फोडले आणि सोने-हिऱ्यांचे दागिने वेगाने बॅगमध्ये भरले. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या संपूर्ण कारवाईला अवघा एक मिनिटही लागला नाही. दरोडेखोरांनी दुकानातील सुमारे ७५ ते ८० टक्के माल लुटून बाहेर उभ्या असलेल्या वाहनांमध्ये बसून घटनास्थळावरून पळ काढला. या लुटीची किंमत जवळपास १.७ दशलक्ष डॉलर्स (सुमारे १५ कोटी रुपये) इतकी असल्याचा अंदाज आहे.

घटनेदरम्यान दुकानात मालक आणि कर्मचारी उपस्थित होते; मात्र कोणालाही गंभीर दुखापत झाली नाही. दरोड्यानंतर पोलिसांनी पाठलाग करत काही संशयित वाहनांचा मागोवा घेतला. या प्रकरणात चार संशयितांना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर फेडरल न्यायालयात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## युद्धाच्या धोक्यातही बंकरला नकार! खामेनेईंचा निर्णय चर्चेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेतील वाढत्या युद्धतणावाच्या पार्श्वभूमीवर इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनेई यांनी सुरक्षित बंकरमध्ये जाण्यास नकार दिल्याचा धक्कादायक खुलासा त्यांच्या निकटवर्तीयांनी केला आहे. वाढत्या हल्ल्यांच्या धोक्यामुळे सुरक्षा यंत्रणांनी त्यांना अनेकदा सुरक्षित ठिकाणी हलवण्याचा सल्ला दिला होता. मात्र खामेनेई यांनी हा सल्ला ठामपणे नाकारत नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिल्याचे सांगितले जाते. खामेनेई यांचे प्रतिनिधी अब्दुल मजीद हकीम इलाही यांनी दिलेल्या माहितीनुसार, युद्धजन्य परिस्थितीतही खामेनेई यांनी आपले निवासस्थान सोडण्यास नकार दिला. ते म्हणाले होते की, "तेहरानमधील सर्वसामान्य नागरिकांसाठी सुरक्षित आश्रयस्थळांची व्यवस्था झाल्याशिवाय मी स्वतः बंकरमध्ये जाणार नाही." त्यांच्या या भूमिकेमुळे त्यांनी स्वतःच्या सुरक्षिततेपेक्षा देशातील नागरिकांच्या सुरक्षेला अधिक महत्त्व दिले असल्याचे स्पष्ट होते. मध्यपूर्वेत वाढत्या तणावामुळे इराणमध्ये सुरक्षेची परिस्थिती अत्यंत संवेदनशील झाली आहे. संभाव्य हवाई हल्ले आणि इतर सुरक्षेच्या धोक्यांमुळे अनेक वरिष्ठ नेत्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याची तयारी करण्यात आली होती. सुरक्षा अधिकाऱ्यांनी खामेनेई यांनाही बंकरमध्ये जाण्याचा सल्ला दिला होता. परंतु त्यांनी तो नाकारत आपल्या निवासस्थानीच राहण्याचा निर्णय घेतला. तणाव वाढत असताना खामेनेई तेहरानमधील आपल्या निवासस्थानीच उपस्थित राहिले. नंतर झालेल्या एका हल्ल्याच्या वेळी ते निवासस्थानाच्या वरच्या भागात होते, अशी माहितीही समोर आली आहे. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चा रंगली आहे. खामेनेई यांच्या या निर्णयामुळे त्यांच्या नेतृत्वशैलीबद्दलही विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. काही तज्ज्ञांच्या मते, युद्धाच्या परिस्थितीतही सामान्य नागरिकांबरोबर उभे राहण्याचा संदेश देण्यासाठी त्यांनी हा निर्णय घेतला असावा. तर काहींच्या मते, हा निर्णय प्रतीकात्मक आहे.

## भारतीयांची बदनामी, मग दिल्ली दौऱ्यात माफी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कट्टर समर्थक आणि उजव्या विचारसरणीच्या कार्यकर्त्या लुरा लुमर यांनी भारताविरोधी सोशल मीडिया पोस्टमुळे निर्माण झालेल्या वादानंतर माफी मागितली आहे. दिल्लीतील इंडिया टुडे कन्क्लेव्ह या कार्यक्रमात बोलताना त्यांनी आपल्या काही वक्तव्यांबद्दल खेद व्यक्त केला.

लूमर यांनी यापूर्वी सोशल मीडियावर भारतीयांबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. त्यामुळे त्या भारत दौऱ्यावर येताच त्यांच्या जुन्या पोस्ट पुन्हा व्हायरल झाल्या आणि सोशल मीडियावर त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात टीका झाली.

या पार्श्वभूमीवर त्यांनी कार्यक्रमात स्पष्टीकरण देताना सांगितले, "मी काही ट्विटमध्ये लिहिलेल्या गोष्टी बोलायला नको होत्या. माझ्या वक्तव्यामुळे कुणी दुखावले असेल तर मी माफी मागते." त्यांनी पुढे असेही सांगितले की, भारत किंवा हिंदू समाजाबद्दल त्यांच्या मनात कोणताही द्वेष नाही.

मात्र, त्यांनी H-1B व्हिसा कार्यक्रमाला विरोध करण्याच्या आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचे स्पष्ट केले. अमेरिकन कामगारांच्या हितासाठी हा विरोध असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, लूमर यांनी कार्यक्रमात बोलताना ट्रम्प यांचा भारतासाठी संदेशही सांगितला. त्यांच्या म्हणण्यानुसार, ट्रम्प यांनी "मला भारत आणि पंतप्रधान मोदी आवडतात" असा संदेश दिला असून भविष्यात भारताला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली आहे. लूमर यांच्या भारत दौऱ्यामुळे आणि त्यांच्या जुन्या सोशल मीडिया पोस्टमुळे निर्माण झालेला वाद काही काळ चर्चेत राहिला होता. मात्र, त्यांच्या माफीच्या वक्तव्यामुळे या प्रकरणावर काही प्रमाणात पडदा पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणच्या राजदूतांचे विधान

# भारताने आम्हाला मोठी मदत केली!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** बहुपक्षीय नौदल युद्धसरावासाठी भारतात आलेली इराणची युद्धनौका IRIS Dena परतत असताना ४ मार्च रोजी अमेरिकेने टॉर्पेडो हल्ला करून ती बुडवल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेत १०० हून अधिक खलाशांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. ही घटना भारताच्या प्रभावक्षेत्रात घडल्याने आणि युद्धनौका Visakhapatnam येथून परतत असल्याने भारतात मोठी चर्चा रंगली होती. मात्र, भारतातील इराणचे राजदूत Mohammad Fattahi यांच्या वक्तव्यामुळे या वादावर काही प्रमाणात पडदा पडल्याचे मानले जात आहे.

इंडिया टुडे कनक्लेव्ह या कार्यक्रमात बोलताना फताली यांनी भारत सरकारने दिलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले, "भारत सरकारने आम्हाला खरोखरच मोठी मदत केली आहे. मी फक्त भारत आणि इराण यांच्याविषयी बोलू इच्छितो. एक राजदूत म्हणून मला प्रत्येक गोष्टीकडे बारकाईने पाहावे लागते."

ते पुढे म्हणाले की, या नौदलाशी संबंधित परिस्थितीत भारताने इराणला महत्त्वाचे सहकार्य केले. काही इतर देशांनी मदतीस नकार दिला असला तरी भारताने केलेली मदत महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, फताली यांनी इराणची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, "इराण कोणत्याही कारवाईला प्रत्युत्तर दिल्याशिवाय शांत बसणार नाही. या घटनेनंतर आम्ही त्यांना नक्कीच प्रत्युत्तर देऊ आणि त्यातील काही कारवाई आम्ही आधीच केली आहे. लवकरच तुम्हाला याबाबत चांगली बातमी ऐकायला मिळेल."

याच दरम्यान भारताने इराणच्या दुसऱ्या युद्धनौकेला IRIS Lavan कोची येथे आश्रय दिला होता. Kochi येथे थांबलेल्या या जहाजावरील अनावश्यक कर्मचाऱ्यांना भारताने मायदेशी पाठवण्याची व्यवस्था केली असल्याची माहिती सूत्रांनी दिली. जहाजावरील १८३ कर्मचाऱ्यांपैकी ५० हून अधिक कर्मचारी अद्याप कोची येथे थांबलेले आहेत.

दरम्यान, अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर मध्यपूर्वेतील तणाव वाढला असून या पार्श्वभूमीवर इराणच्या युद्धनौकांवरील कारवाई आणि त्यानंतरची आंतरराष्ट्रीय प्रतिक्रिया याकडे जगाचे लक्ष लागले आहे.

## पंजाबमध्ये ISI समर्थित दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अमृतसर :** पंजाब पोलिसांनी मोठी कारवाई करत पाकिस्तानच्या गुप्तहेर संस्था समर्थित दहशतवादी आणि सीमापार शस्त्रास्त्र तस्करी करणाऱ्या मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत दोन संशयितांना अटक करण्यात आली असून त्यांच्या ताब्यातून अत्याधुनिक शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई अमृतसर ग्रामीण भागात करण्यात आली.

पंजाबचे पोलीस महासंचालक यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांनी घरिंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. प्राथमिक चौकशीत आरोपी सोशल मीडियाच्या माध्यमातून परदेशात बसलेल्या हँडलर्सच्या संपर्कात असल्याचे समोर आले आहे. हे मॉड्यूल कट्टरतावाद पसरवणे तसेच भारतविरोधी आणि पोलिसविरोधी प्रचार करण्यातही सक्रिय असल्याचा संशय आहे. या कारवाईदरम्यान पोलिसांनी एक एके-47 रायफल, दोन मॅगझिन आणि ३६ जिवंत काडतुसे जप्त केली. त्याशिवाय तीन अत्याधुनिक Glock 9mm पिस्तुलेही हस्तगत करण्यात आली आहेत. हा शस्त्रसाठा सीमापार तस्करीद्वारे भारतात आणल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. पोलिसांच्या मते, या मॉड्यूलचे इतर सदस्य आणि त्यांचे परदेशातील संपर्क शोधण्यासाठी तपास सुरू असून संपूर्ण नेटवर्क उघड करण्याचा प्रयत्न केला जात आहे. दहशतवाद, बेकायदेशीर शस्त्रास्त्र तस्करी आणि संघटित गुन्हेगारीविरुद्ध कठोर कारवाई सुरूच राहील, असेही पंजाब पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### सोनम वांगचुक यांची नजरकैदेतून सुटका

**मुंबई :** लडाखमधील पर्यावरणवादी व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांची नजरकैदेतून सुटका करण्याचे आदेश विदेश मंत्रालय यांनी दिले आहेत.

राष्ट्रीय सुरक्षा कायद्यान्वये गेल्या सहा महिन्यांपासून त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले होते. मात्र, लडाखमध्ये शांतता आणि स्थिरतेसाठी संवादाचे वातावरण तयार करण्याच्या उद्देशाने त्यांची अटक रद्द करण्यात आल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले.

## अफगाणिस्तानात ट्रकमधून बर्फ विक्री; व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सोशल मीडियावर सध्या अफगाणिस्तानमधील एक वेगळाच व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकमधून लोकांना बर्फ विक्री केली जात असल्याचे दिसत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही अशा पारंपरिक पद्धतीने बर्फ विक्री होत असल्याने अनेकजण आश्चर्य व्यक्त करत आहेत.

व्हायरल व्हिडिओमध्ये एक छोटा ट्रक पूर्णपणे बर्फाने भरलेला दिसतो. रस्त्याच्या कडेला उभे असलेले काही लोक ट्रकमधून प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये भरलेला बर्फ खरेदी करताना दिसतात. ट्रकमधील व्यक्ती मोठ्या बर्फाच्या तुकड्यांचे छोटे भाग करून ते ग्राहकांना विकत असल्याचेही दिसते. माहितीनुसार, हा बर्फ हिंदुकुश पर्वतरांगांमधून आणला जातो. पर्वतीय भागातून ट्रकमध्ये भरून हा बर्फ अशा प्रदेशात नेला जातो, जिथे वीजेची कमतरता असल्यामुळे अनेक घरांमध्ये फ्रिज उपलब्ध नसतात. त्यामुळे लोक पाणी किंवा अन्नपदार्थ थंड ठेवण्यासाठी बर्फ खरेदी करतात. हा १६ सेकंदांचा व्हिडिओ सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर @sciencegirl या अकाउंटवरून शेअर करण्यात आला आहे. या व्हिडिओला आतापर्यंत सुमारे १.३० लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले असून शेकडो लोकांनी त्यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत.

या व्हिडिओवर अनेकांनी अफगाणिस्तानमधील लोक मर्यादित साधनांमध्येही आपली गरज भागवण्यासाठी आणि व्यवसायाची संधी निर्माण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले आहे.

## धार्मिक विद्वानांशी चर्चा करण्याची मागणी; ९ न्यायाधीशांचे घटनापीठ ७ एप्रिलपासून सुनावणी करणार

# शबरीमला प्रकरणात केरळ सरकारने भूमिका बदलली!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** केरळमधील शबरीमला मंदिर येथे ठराविक वयोगटातील महिलांच्या प्रवेशावरील निर्बंधांच्या मुद्द्यावर केरळमधील सत्ताधारी (एलडीएफ) सरकारने आपली भूमिका बदलल्याचे स्पष्ट झाले आहे. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या धार्मिक प्रथेबाबत कोणताही बदल करण्यापूर्वी हिंदू धर्मातील नामवंत धार्मिक विद्वान आणि समाजसुधारकांशी व्यापक चर्चा करून त्यांची मते जाणून घेणे आवश्यक असल्याचे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे.

महिलांच्या प्रवेशावरील निर्बंध उठवणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या २८ सप्टेंबर २०१८ च्या ऐतिहासिक निर्णयाच्या पुनर्विलोकनासाठी दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर आता ९ न्यायाधीशांचे घटनापीठ सुनावणी घेणार आहे. या संदर्भात न्यायालयात सादर केलेल्या लेखी उत्तरात केरळ सरकारने नमूद केले आहे की, राज्यघटनेच्या कलम २५ अंतर्गत न्यायालयीन पुनर्विलोकन करताना एखादी धार्मिक प्रथा तर्कसंगत आहे की नाही याचा विचार करण्यापेक्षा ती श्रद्धा त्या धर्माचा अविभाज्य भाग म्हणून प्रामाणिकपणे पाळली जाते का, हे तपासणे अधिक महत्त्वाचे आहे.

सरकारने आपल्या उत्तरात असेही नमूद केले आहे की, लोकांच्या श्रद्धा आणि मूल्यांशी संबंधित असलेल्या जुन्या धार्मिक प्रथांचे न्यायालयीन परीक्षण करताना धार्मिक विद्वान तसेच प्रतिष्ठित समाजसुधारकांचा सल्ला घेणे हिताचे ठरेल. अशा विषयांमध्ये न्यायालयाने समाजातील विविध मतांचा विचार करूनच निर्णय घ्यावा, असेही सरकारने स्पष्ट केले आहे.

ही भूमिका वरिष्ठ वकील जयदीप गुप्ता आणि वकील निशे राजन शोनकर यांच्या माध्यमातून न्यायालयात सादर करण्यात आली. शबरीमला मंदिराशी संबंधित मागील अनुभव तसेच महिला भाविक आणि इतर श्रद्धाळूंच्या प्रतिक्रिया लक्षात घेऊनच सरकारने ही भूमिका मांडल्याचेही उत्तरात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाच्या सुनावणीसाठी ९ न्यायाधीशांचे घटनापीठ स्थापन करत सात महत्त्वाचे घटनात्मक प्रश्न निश्चित केले आहेत. धार्मिक स्वातंत्र्य आणि राज्यघटनेतील इतर मूलभूत अधिकारांचा परस्पर संबंध, 'संविधानिक नैतिकते'ची व्याप्ती, अत्यावश्यक धार्मिक प्रथा ठरवताना न्यायालयीन पुनर्विलोकनाची मर्यादा तसेच धार्मिक प्रथांना जनहित याचिकेद्वारे आव्हान देता येते का, अशा महत्त्वाच्या मुद्द्यांवर न्यायालय मार्गदर्शक भूमिका स्पष्ट करणार आहे. या महत्त्वाच्या प्रकरणाची सुनावणी ७ एप्रिल २०२६ पासून सुरू होणार असून देशभरातील धार्मिक, सामाजिक आणि कायदेविषयक वर्तुळांचे लक्ष या निकालाकडे लागले आहे.